महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत
ओम सुपर मार्केट जवळ, बहिरट पाटील चौक,
शिवाजी नगर, पुणे - ४११ ०१६

दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. :तंशिविकापु/विवि-५/संकीर्ण/२०२३/ 2024 दिनांक : 15 MAY 2023

## परिपत्रक

प्रति,
प्राचार्य / संचालक,
या कार्यालयाचे अधिनस्त सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित/
खाजगी विनाअनुदानित संस्था.

**विषय : - " चला जाणू या नदीला" या नदी संवाद यात्रेत विद्यार्थ्यांनी सहभागी होण्याबाबत.**

**संदर्भ :- १. शासन पत्र उच्च व तंत्रशिक्षण विभाग म.शा, मंत्रालय मुंबई यांचे पत्र क्र.संकीर्ण-११११/(१४/२३)तांशि-२, दिनांक, २७.०४.२०२३**

**२. मा. उपसंचालक, तंत्रशिक्षण म.रा.मुंबई यांचे पत्र क्र. २ अ/एडीएम२०२३/१३९ दि. ०८.०५.२०२३**

उपरोक्त विषयास अनुसरुन संदर्भीय पत्रामध्ये नमूद केल्यानुसार स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त महाराष्ट्र शासनाने " चला जाणू या नदीला " हा नदी संवाद यात्रेचा अभिनव उपक्रम हाती घेतला आहे. या उपक्रमांतर्गत नदयांचा अभ्यास व त्याबद्दल जनजागृती हा प्राधान्यक्रम आहे. या उपक्रमात या विभागीय कार्यालयाच्या अंतर्गत असलेल्या तांत्रिक व्यावसायिक पदविका, पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थांमधील अध्यापक आणि विद्यार्थ्यांना संस्थाप्रमूखांनी सदर उपक्रमात सहभाग घेण्याबाबत कळविण्यात यावे. तसेच त्याबाबतचा अनुपालन अहवाल या विभागीय कार्यालयास **संस्थाप्रमूखांच्या स्वाक्षरीसह** info.dteropune@gmail.com **या ईमेलवर सादर करण्यात यावा.**

सोबत : संदर्भीय पत्र.

(डॉ.द.व्यं.जाधव)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पूणे.

प्रत : प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.

महाराष्ट्र शासन

**तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य**

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४६५/४५०/४४७

ई-मेल – desk2a@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: http://www.dte.maharashtra.gov.in

क्रमांक: २अ/एडीएम/ २०२३/ ९३९ दिनांक : 08 MAY 2023

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई,पुणे,नाशिक,औरंगाबाद,अमरावती,नागपूर

विषय : " चला जाणू या नदीला " या नदी संवाद यात्रेत विद्यार्थ्यांनी सहभागी होण्याबाबत...

संदर्भ : शासन पत्र उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक संकीर्ण-१११११/(१४/२३)/तांशि-२, दिनांक २७.४.२०२३

महोदय,

वरील विषयाबाबत कळविण्यात येते की, स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवानिमित्त महाराष्ट्र शासनाने " चला जाणू या नदीला " हा नदी संवाद यात्रेचा अभिनव उपक्रम हाती घेतला आहे. या उपक्रमांतर्गत नदयांचा अभ्यास व त्याबद्दल जनजागृती हा प्राधान्यक्रम आहे.या उपक्रमात आपल्या अधिनस्त असलेल्या तांत्रिक व्यावसायिक पदविका,पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थांमधील अध्यापक आणि विद्यार्थ्यांना सहभागी होण्याबाबत आपल्या स्तरावरुन कळविण्यात यावे ही विनंती. (सोबत शासन पत्र सहपत्रासह जोडले आहे)

आपला,

( डॉ.गोविंद संगवई )
प्र.उपसंचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई

प्रत : माहितीसाठी

१. मा.प्रधान सचिव,महाराष्ट्र शासन,उच्च व तंत्रशिक्षण विभाग,मंत्रालय विस्तारभवन,मुंबई ४०० ०३२ (लक्षवेध : श्री विनोद दळवी,अवर सचिव tashi2-hted@mah.gov.in)
२. कार्यासन क्रमांक १०,४ व ४अ ,मुख्य कार्यालय,मुंबई

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
पुणे.
10 MAY 2023
आवक क्र. 8044

E:\Budage\2023-24\General Correspondence\Know the Rivers expidition.docx

(पत्र प्राप्त झाले 27 APR 2023 आवक लिपिक तंत्र शिक्षण संचालनालय, ३, महापालिका मार्ग, मुंबई-१.) 337

"जनहितार्थ सर्वदा"

महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्रशिक्षण विभाग, ४ था मजला,
मंत्रालय (विस्तार), मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई- ४०० ०३२

E mail - tashi२-hted@mah.gov.in

---

क्रमांक : संकिर्ण-११११/(१४/२३)/तांशि-२ दिनांक : २७/४/२०२३

प्रति,
संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, मुंबई-०१

विषय :- तक्रारीबाबत प्राप्त अर्ज.......

महोदय,

प्रस्तुत प्रकरणी विविध विषयाच्या अनुषंगाने विविध पत्राव्दारे खालील प्रमाणे शासनास तक्रारी व निवेदने प्राप्त झालेल्या आहेत.

| अक्र | पत्राचा दिनांक | कार्यालय/अर्जदार | तक्रारीचा विषय |
|---|---|---|---|
| १. | दि. .... | मानव संसाधन विकास संस्था, पुणे | IIT मुंबई मध्ये Ph.D. प्रवेश मिळणेबाबत |
| २. | दि. २०/३/२०२३ | श्री. सुधीर मुनगंटीवार, मा. मंत्री वने व सांस्कृतीक कार्य, मत्स्यव्यवसाय | "चला जाणूया नदीला" या उपक्रमामध्ये विध्यार्थ्यांच्या सहभागाबाबत |
| ३. | दि. ८/३/२०२३ | श्री. जी. पी. भेरडे | भारत कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, बदलापूर या संस्थेच्या संदर्भात तक्रार. |

२. आपणांस विनंती करण्यात येते की, सोबत जोडलेल्या छायांकित पत्राचे अवलोकन करून उपरोक्त तक्त्यात नमूद केलेल्या विषयाच्या अनुषंगाने आपल्या स्तरावर कार्यवाही करण्यात यावी, ही विनंती.

आपला,

(विनोद वं. दळवी)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

सोबत : वरीलप्रमाणे

मंत्री
वने, सांस्कृतिक कार्ये, मत्स्यव्यवसाय
महाराष्ट्र राज्य
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
*www.maharashtra.gov.in*

दिनांक : 20 MAR 2023

महोदय,

वंदे मातरम् !

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाच्या निमित्ताने महाराष्ट्र शासनाने चला जाणूया नदीला हा नदी संवाद यात्रेचा अभिनव उपक्रम हाती घेतलेला आहे. या उपक्रमामध्ये महाराष्ट्रातील सुमारे ७५ पेक्षा अधिक नद्यांचा अभ्यास हाती घेण्यात आलेला आहे. या नद्यांवर स्वयंस्फूर्त आणि स्वयं प्रेरणेने काम करण्यासाठी नदी प्रहरी यांची निवड झालेली असून ते कार्यरत आहेत.

दिनांक २ ऑक्टोबर २०२२ रोजी सेवाग्राम येथून मा. उपमुख्यमंत्री मा. महसूल मंत्री आणि माझ्या उपस्थितीत या कार्यक्रमाची सुरुवात झालेली आहे. या कार्यक्रमांतर्गत नद्यांच्या अभ्यास व त्याबद्दल जनजागृती हा प्राधान्यक्रम आहे.

नद्यांच्या अभ्यासामध्ये नद्यांवर झालेल्या आघातांचा अभ्यास करणे हे प्राधान्य आहे. त्याचा शास्त्रीय अभ्यास करून त्यानुसार त्याची पुढील कृती कार्यक्रम आणि उपचाराची दिशा ठरणार आहे.. जिल्हास्तरीय समितीचे अध्यक्ष जिल्हाधिकारी असून जिल्ह्यात असणाऱ्या विद्यापीठ, अभिमत विद्यापीठ, तंत्रनिकेतने, कृषी विद्यापीठे, वैद्यकीय विद्यापीठ, पशुसंवर्धन व मत्स्य व्यवसाय विद्यापीठ, या सर्व विद्यापीठांच्या कुलगुरूंना सदस्य म्हणून समितीवर स्थान देण्यात आलेले आहे. उन्नत भारत अभियान, आणि उन्नत महाराष्ट्र अभियान या अंतर्गत शैक्षणिक संस्था त्याचप्रमाणे शैक्षणिक संस्थात शिकत असलेले विद्यार्थी यांच्या ज्ञानाचा आणि कौशल्याचा वापर समाजाभिमुख कामांमध्ये व्हावा हा यामागील उद्देश आहे.

उपरोक्त अनुषंगाने चला जाणूया नदीला हया अभियानात आपल्या विद्यापीठातील विद्यार्थ्यांचा त्याचप्रमाणे अध्यापकांचा सहभाग अत्यंत गरजेचे आहे. ग्रामीण स्तरावर आणि नागरी स्तरावर अभ्यास करण्यासाठी नदी प्रहरींची फळी आहे. त्यांची मदत विद्यार्थ्यांना निश्चितच होईल.

विद्यापीठात असणाऱ्या विविध विभागातील उदाहरणार्थ वैद्यकीय, पशुवैद्यकीय कृषी अंतर्गत अभियांत्रिकी इत्यादी मधील तज्ञ अध्यापक आणि विद्यार्थी यांना या यामध्ये सक्रिय सहभाग घेण्याबाबत तसेच विशेष अभ्यास करण्याबाबत आपल्या स्तरावरुन आवश्यक त्या सुचना संबंधितांना देण्याची विनंती आहे.

आपला

(सुधीर मुनगंटीवार)

मा.श्री. चंद्रकांत (दादा) पाटील
मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण